पुढारी

शनिवार, २८ सप्टेंबर २०१९ पिंपरी पुढारी ११

# धारीवाल महाविद्यालयात 'ॲड मॅड' स्पर्धा

**पिंपरी: प्रतिनिधी**

'श्री जैन विद्या प्रसारक मंडळ' संचलित चिंचवड येथील 'रसिकलाल एम. धारीवाल कॉलेज ऑफ फ ार्मसी महाविद्यालया' मध्ये ५८ व्या फ ार्मसी सप्ताहाचे औचित्य साधून 'आय.पी. ए.' (इंडियन फ ार्मासुटिकल असोशिएशन) पुरस्कृत 'ॲड मॅड' स्पर्धा पार पडली.

यावेळी मंडळाचे सेक्रेटरी ॲड. राजेंद्र मुथ्था, कार्यकारी अधिकारी नंदकुमार निकम, प्रा. एस. ए. फेगडे व परिक्षक प्रा. डॉ. टी. एन. नांदगुडे आणि एस. आर. काकड उपस्थित होते.

स्पर्धेमध्ये 'डि' फार्मसीमधून प्रथम क्रमांक भालचंद्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी पुणे, तर द्वितीय ए. ई. एस. कॉलेज ऑफ फार्मसी नऱ्हे, तसेच 'बी' फार्मसीमधून प्रथम क्रमांक भालचंद्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी पुणे, तर द्वितीय क्रमांक डॉ. डी. वाय. पाटील फार्मसी कॉलेज पिंपरी, व 'एम' फार्मसी मधून प्रथम क्रमांक पूना कॉलेज पुणे, तर द्वितीय क्रमांक इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी ताथवडे या महाविद्यालयाने पटकावला.

स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रा. सुचेता खोत यांनी केले. आभार प्रा. मनिषा खैरे यांनी मानले.

RASIKLAL M. DHARIWAL COLLEGE OF PHARMACY
LIBRARY SECTION D. PHARM
Chinchwad, Pune 19.

LIBRARIAN
RASIKLAL M. DHARIWAL
COLLEGE OF PHARMACY
Chinchwad Station, Pune -411019.

PRINCIPAL
RASIKLAL M. DHARIWAL
COLLEGE OF PHARMACY
Chinchwad Station, Pune-411 019.